मराठी LIVE

# आरेची वनसंपत्ती कशी जपणार ?

## वृक्षारोपणाआधीच झाडांचा मृत्यू ▪ एमएमआरसीच्या हलगर्जी कारभाराचे बळी

▶ प्रतिनिधी

***मुंबई*** : मेट्रो-३ प्रकल्पाच्या कारडेपोसाठी आरे कॉलनीतील तब्बल २३०० झाडांची कत्तल होण्याची शक्यता असताना, या झाडांच्या जागेवर रोपणासाठी आणलेली झाडे जपणेही मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनला अद्याप जमलेले नाही. वृक्षारोपणासाठी नर्सरीत आणलेली झाडे आधीच सुकून गेली असून, अनेक कोमेजलेली झाडे केविलवाण्या अवस्थेत आपल्याला कधी पाणी घालणार, याची प्रतीक्षा करताना दिसून येत आहेत. ही झाडे लावण्याआधीच जर वाळून जात असतील तर लावलेल्या झाडांची देखभाल एमएमआरसी करणार तरी कशी, हा सवाल आता आरे वाचवा मोहिमेतील कार्यकर्ते करताना दिसत आहेत.



प्रस्तावित कारशेडच्या समोरच्या जागेवर ही नर्सरी उभारण्यात आली आहे. या नर्सरीतील झाडांना वेळेवर पाणी न मिळाल्याने अर्ध्याहून अधिक झाडे सुकून गेली आहेत. पिंपळ आणि वडासारख्या झाडांची अवस्थाही पाण्याअभावी केविलवाणी झाली आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे एमएमआरसीने काही दिवसांपूर्वी वृक्षारोपण केले. पण हे वृक्षारोपण करताना, मूलभूत नियमांचे पालनच केले नसल्याचे दिसून येते. कारण दोन झाडांमध्ये किमान अंतर ठेवले गेलेले नाही. त्यामुळे भविष्यात या झाडांची वाढ खुंटू शकते, अशी भीती वनशक्ती संस्थेच्या स्टेलिन डी यांनी व्यक्त केली.

दरम्यान, आरेच्या जागेवर मेट्रोचा कारडेपो उभारण्यास विरोध करण्यासाठी अभिनव कल्पना आरे वाचवा आंदोलनातील कार्यकर्त्यांनी राबवली आहे. या जागेवरच लहान मुलांचे क्रिकेटचे सामने आयोजित केले जात आहेत. ही जागा स्थानिकांची आहे. त्याची मालकी एमएमआरसीकडे गेल्याची लेखी कागदपत्रे आम्ही पाहिलेली नाहीत; त्यामुळे अशा प्रकारे आमचा लढा पुढेही सुरू राहील, असे आपच्या मोना आंबेगावकर यांनी सांगितले. एमएमआरसीच्या व्यवस्थापकीय संचालिका अश्विनी भिडे यांनी मात्र ही झाडे नुकतीच आणली होती, असे सांगून या विषयावर अधिक बोलण्यास नकार दिला.

> झाडे सुकलेली असावीत. गेल्या दोन दिवसांत माझी पाहणी झालेली नाही. ही झाडे काही आठवड्यांपूर्वीच गुजरात आणि आंध्र प्रदेशाहून आणली गेली होती. काही झाडे कदाचित वृक्षारोपणाअगोदरच मरतील, असा अंदाज आहे. जी झाडे सुकली ती लावली जाणार नाहीत. प्रवासामुळे ही झाडे मेली असावीत.
>
> - चारुहास जाधव, अधीक्षक, एमएमआरसी

